VOL- VI ISSUE-IX SEPTEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# संविधानातील कलम ३५६ – केंद्र सरकार विरूध्द उच्च न्यायालय

**डॉ. तांदळे डी.आर.,**
राज्यशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

2 एप्रिल 1993 रोजी सुंदरलाल पटवा यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचे सरकार 356 कलमांतर्गत बडतर्फ करून मध्य प्रदेशात राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा निर्णय मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने रद्दबातल ठरविला. यामुळेच न्यायालय आणि केंद्रसरकार यांच्यामध्ये संघर्ष होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

6 डिसेंबर रोजी अयोध्येतील बाबरी मशीद पाडण्यात आल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीला भाजपला जबाबदार धरून केंद्रातील नरसिंहराव सरकारने सर्वात आधी उत्तरप्रदेश व त्यानंतर 15 डिसेंबर रोजी मध्यप्रदेश, राजस्थान व हिमाचल प्रदेशातील भाजपची सरकारे बडतर्फ केली होती. या कारवाईला मध्यप्रदेशचे त्यावेळचे मुख्यमंत्री सुंदरलाल पटवा व इतर तिघांनी आव्हान दिले होते. त्याचा विचार करण्यासाठी न्यायमूर्ती एस. के. झा, न्यायमूर्ती के.एम. अग्रवाल व न्यायमूर्ती धर्माधिकारी यांचा समावेश असलेले पूर्णपीठ स्थापन करण्यात आले होते. त्या पीठाने बहुमताने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. केंद्राच्या कारवाईवर मत प्रदर्शित करताना, मध्य प्रदेशातील राष्ट्रपती राजवट लागू करण्याची कारवाई बेकायदेशीर असून घटनेतील 356 व्या कलमातील अधिकारांनुसार ती केली गेली नसल्याचे म्हटले आहे.

केंद्र सरकारचा निर्णय उच्च न्यायालयाने अवैध ठरविला असल्यामुळे ही घटना राजकीय वादळ उठविणारी ठरली आहे. कारण घटना अंमलात आल्यापासून आतापर्यंत केंद्र सरकारने राष्ट्रपतींबरोबर निरनिराळ्या घटक राज्यात कलम 356 खाली राष्ट्रपती राजवट लागू करण्याचे जे जे निर्णय घेतले होते ते एकदाही न्यायालयाने अवैध म्हणून घोषित केले नव्हते. पण या निर्णयामुळे सर्व पारडे फिरले. यापुढे जर सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयावर शिक्कामोर्तब केले तर आगामी राजकारणातील ती एक समस्या ठरेल, असे बोलले जात आहे.

भारताच्या संघराज्य पध्दतीत प्रशासकीय घटनात्मकता जपण्याची अंतिम जबाबदारी ही न्यायालयाची असली तरी या जबाबदारीचा काही अंश सरकारवर अपरिहार्यपणे येऊन पडतो. याच दृष्टीकोनातून 356 कलमाची रचना घटनाकारांनी केली असल्याचे जाणवते. मात्र कोणत्या परिस्थितीत राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात येईल, यावर घटना गप्प आहे. यामुळे अमूर्त स्वरूपातील आदर्शाचे परिणाम स्वीकारणे आतापर्यंत भारतातील न्यायव्यवस्थेला आवश्यक न वाटल्याने घटनाकलम 356 चा गैरवापर रोखणे कधीच शक्य झाले नाही. भारतीय न्यायव्यवस्थेने केंद्रसरकारच्या निर्णयाला कधीच आव्हान दिले नाही हे खालील उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

राज विरेंद्र सिंग (हरियाणा) विरूध्द केंद्र सरकार (1967) : 1967 च्या निवाड्यात केंद्र सरकारने हे स्पष्ट केले की 1967 ला राष्ट्रपतींनी हरियाणाला लागू केलेली राष्ट्रपती राजवट ही राष्ट्रपतींच्या घटनात्मक अधिकारात मोडते. ती प्रशासकीय कृती नसल्याने वरिष्ठ न्यायालयाला त्या कृतीच्या वैधतेची, कायदेशीरतेची किंवा योग्यायोग्यतेची चर्चा करता येणार नाही. या कृतीच्या पुनर्विचाराचा अधिकार फक्त भारतीय संसदेलाच आहे. तसेच राज्यपालांनी राष्ट्रपतींना या संदर्भात पाठविलेल्या अहवालाची चिकित्साही न्यायालयाला करता येणार नाही.

ओरिसा उच्च न्यायालयाने 1973 मध्ये 27 ऑक्टोंबर रोजी दिलेला निकाल त्या दृष्टीने पाहण्यासारखा आहे. त्यावेळी त्या न्यायालयाने म्हटले होते की, राज्याचे स्थैर्य विधानसभेत सरकारला असलेला पाठिंबा मोजूनच ठरवणे योग्य आहे. तसे न केल्यास राज्यपाल या बाबतचे संकेत पाळत नाहीत असे म्हणावे लागेल, पण राष्ट्रपती राजवट राज्यात लागू करण्याचा निर्णय न्यायालयीन अधिकारकक्षेच्या बाहेरचा आहे. थोडक्यात, विधानसभा बरखास्तीमध्ये घटनात्मक अनौचित्य नाही. मात्र सबल लोकशाहीच्या दृष्टीने असे निर्णय केले जाणे चांगले नाही. घटनेच्या 356 व्या कलमाच्या व्याप्तीचे तपशील तपासण्याचा, चौकशी करण्याचा, कारणे तपासण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला नाही असे पूर्वी सर्वोच्च न्यायालयानेही म्हटले आहे. हे लक्षात घेता सर्वोच्च न्यायालय आपले ह`मत आता बदलेल हे फारसे संभवत नाही. शिवाय 356 व्या कलमातील तरतुदींचे उल्लंघन सरकारने केले असल्याचे जे उच्च न्यायालयाने म्हटले आहे ते कशाच्या आधारावर, हे पुरेसे स्पष्ट होत नाही. त्याचाही विचार सर्वोच्च न्यायालयात होईल.

सर्वोच्च न्यायालयाने यदाकदाचित उच्च न्यायालयाचा हा निर्णय उचलून धरलाच तर अंमलबजावणी कशी होणार. हा एक प्रश्न आहे. कारण बरखास्त विधानसभा पुन्हा बोलविण्याची तरतूद नाही. मग निवडणुका घेण्यापलीकडे पर्याय राहणार नाही. प्राप्त परिस्थितीमध्ये केंद्र सरकार चांगलेच अडचणीत आलेले आहे. गोवा, महाराष्ट्र आणि आता मध्ये प्रदेशातील महत्त्वाचे न्यायालयीन निकाल केंद्रातील सत्ताधारी पक्षालाही हानी पोहोचवू शकतील असे आहेत. जनमानसात सरकारची आणि त्याच्या पक्षाची प्रतिमा त्यामुळे काळवंडणे साहजिक आहे.

राजस्थान सरकार विरूध्द केंद्र सरकार (1977) : 1977 मध्ये राजस्थान सरकारने केंद्र सरकार विरूध्द केलेल्या राष्ट्रपती राजवटी विरूध्दच्या तक्रार अर्जाबाबत सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले की एखाद्या घटक राज्यातील शासनव्यवस्था घटनेप्रमाणे चालली आहे किंवा नाही याबद्दल राष्ट्रपतींनी काढलेला निष्कर्ष व्यक्तिगत स्वरूपाचा असून त्या गुणावगुणात न्यायालयास शिरता येणार नाही. असे केले तर कार्यकारी मंडळाच्या अधिकारक्षेत्रात न्यायालयाने ढवळाढवळ केली, असा होईल.

परंतू 1977 च्या सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयात न्या. भगवती व न्या. गुप्ता यांनी मात्र बहुमताने व्यक्त झालेल्या वरील विचारांपेक्षा भिन्न विचारांचे निकालपत्र मांडले. त्यांच्या मते राष्ट्रपतींचा हा निर्णय वस्तुनिष्ठतेवर आधारलेला नसेल, व त्याचा अन्योन्य संबंध प्रत्यक्षात आढळत नसेल तर राष्ट्रपतींच्या या आदेशाची वैधता किंवा घटनात्मकता तपासण्याचा पूर्ण अधिकार न्यायालयाला आहे.

या निर्णयानंतर घडलेली एक महत्त्वाची घटना म्हणजे 1977 मध्ये केली गेलेली 44 वी घटनादुरूस्ती त्याआधी जी 42 वी घटनादुरूस्ती झाली, त्यात हे नमूद करण्यात आले की राष्ट्रपतींना दिलेली आणीबाणी घोषित करण्याची सत्ता न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या बाहेर आहे पण त्यानंतर सत्तेवर आलेल्या जनता पक्षाच्या सरकारने 44 व्या घटनादुरूस्तीने राष्ट्रपतींच्या आणीबाणीविषयक न्यायालयीन पुनर्विलोकनक्षम केली. याचाच आधारे ए.के. रॉय विरूध्द भारत सरकार या 1982 च्या संघर्षात सर्वोच्च न्यायालयाने घेऊन राष्ट्रपतींच्या आणीबाणीविषयक निर्णयाचे समीक्षण न्यायप्रविष्ट होऊ शकते, हे मान्य केले.

मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने 44 व्या घटना दुरूस्तीचाच आधार घेऊन बहुमताने पटवा सरकारची बरखास्ती ही अवैध अयोग्य व दूषित हेतूने झालेली व म्हणून सत्तेच्या गैरवापराचे दर्शन घडविणारी आहे हे नमूद केले. तसेच निर्णयात पुढे म्हटले आहे की चाळीस वर्षांच्या प्रवासानंतर भारतीय लोकशाही प्रौढ होऊ लागली आहे. ती उत्तरोत्तर परिपक्क बनू लागली आहे. त्यामुळे राजकारणात अलिप्तपणा राखणाऱ्या न्यायालयाची भूमिका आता महत्वाची ठरू लागली आहे. कारण राजकीय पदाधिकाऱ्यांकडून बाळगलेल्या राजनैतिक मूल्याधिष्ठित वर्तनाच्या अपेक्षा कितपत पूर्ण होतात हे पाहण्याची जबाबदारी न्यायालयाची आहे.

मध्य पद्रेश उच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयामुळे संपूर्ण घटनेचे पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे असे बोलले जाते. परिपक्क लोकशाहीची प्रक्रिया गतिमान करण्यास आवश्यक असे हे पाऊस आहे. कॉंग्रेस (आय) प्रधानपक्ष असणारी बहुपक्ष पध्दती आता उरलेली नाही. त्यामुळे पक्षांतरबंदी कायदा, संसदेचे व विधिमंडळाचे विशेषाधिकार या संबंधीचे प्रश्नही आता न्यायालयाकडे मोठ्या संख्येने येतील. त्यामुळे घटनेची परिवर्तनीयतांही अपरिहार्य अशी गरज वाटायला लागली आहे.

उच्च न्यायालयाचा हा निर्णय केंद्रसरकारला धक्कादायक असाच आहे. केंद्र सरकार या विरूध्द सर्वोच्च न्यायालयात आव्हानही देईल. परंतु सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय ग्राहृय ठरविला तर केंद्र सरकार अडचणीत येईल व कलम 356 चा वापर करून बडतर्फ केलेल्या राजस्थान व हिमाचल प्रदेशच्या बाबतीतही केंद्रसरकारच्या निर्णयाविरूध्द फेरविचार करण्याची मागणी होईल. यादृष्टीने 356 वे कलम आज कात्रीत सापडले असल्याचे दिसते.

**संदर्भ :-**

1- भा.ल. भोळे - भारतीय राज्यघटना.
2- डॉ. भूषणकुमार जोगुलवार - भारताचे शासन आणि राजकारण.
3- डॉ. शांताराम भोगले - भारताचे शासन आणि राजाकरण.
4- भारतीय संविधान.
5- दैनिक महाराष्ट्र टाईम.
6- दैनिक लोकमत.